## उत्तर पत्रिका

डार्लिंग तू मला "कसा आहेस" असा टेक्स्ट टाकलास
कदाचित तुझा वेळ जात नसेल
किंवा तू नवीन फोन टेस्ट करीत असशील
किंवा खरोखरंच तुला तसे विचारायचे असेल!

तुझ्या या प्रश्नाने मी विचारात पडलो
खरंच! मी कसा आहे?
चांगला, सद्‌गुणी, सर्वांना हवाहवासा? तुला तरी?
की, नालायक, कोडगा, दुर्गंधी, नकोसा!

मधमाशांच्या पोळ्यावरून झुळुक जावी
आणि माशा दचकून इतस्ततः उडाव्यात
तसे माझे विचार सैरावैरा झालेत
फार विचित्र प्रश्न टाकलास प्रिये

जिथे तुझा आवाज कान टवकारूनही
ऐकू येत नाही; तुझ्या अंगाचा धुंद गंध
दीर्घ श्वासालाही सापडत नाही, जिथे
तुझा मऊ स्पर्श चाचपडण्यात आयुष्य जाते

जिथे तुझे शब्द यांत्रिक होऊन सुखावण्याऐवजी
बाणासारखे टोचण्याचेच काम करतात
तिथे मी अजून कसा असणार
सांग ना तूच प्रिये मजला कवळून!

December 2012